महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गाव तलाव, पाझर तलाव व पारंपारिक पाणी साठयामधील गाळ काढणेबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र.१८/पुनर्बांधणी/रोहयो-१

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २८ मार्च, २०१३

वाचा : १. शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०११/प्र.क्र.१८/रोहयो-१. दि.२२ मार्च, २०११

२. शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०११/प्र.क्र. १८/रोहयो-१. दि.१४ सप्टेंबर, २०१२

३. शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र. १८/पुर्नबांधणी/रोहयो-१. दि. १८ सप्टेंबर, २०१२

४. शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र. १८/पुर्नबांधणी/रोहयो-१ दिनांक २ नोव्हेंबर, २०१२

परिपत्रक :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ च्या अनुसूची-१ मधील परिच्छेद क्र. ५ तसेच महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, २००६ च्या परिच्छेद क्र.७ (२) (अे) अन्वये पारंपारिक पाणी साठा/तलावातील गाळ काढण्याच्या कामास मान्यता आहे. तद्नुसार संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २२ मार्च, २०११ अन्वये शासनाने गाळ काढण्याच्या कामासंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच संदर्भाधीन दिनांक १४ सप्टेंबर, २०१२ च्या शासन परिपत्रकान्वये पारंपारिक पाणी साठयामधील २५० हेक्टरपेक्षा मोठया तलावातून/धरणातून काळ काढण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच सदर कामास ३१ मार्च, २०१३ पर्यन्त मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. तद्नंतर, संदर्भाधीन दिनांक २ नोव्हेंबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये गाळ काढण्याच्या मूळ दि.२२ मार्च, २०११ च्या शासन निर्णयात सुधारणा करुन ३० मीटरच्या पुढे ३ कि.मी. पर्यन्त गाळ वाहतुक करण्यासाठी ट्रॅक्टरचा वापर करण्याबाबत मान्यता देऊन, त्याची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

३. उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे गाळ काढण्याचे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अनुज्ञेय असल्यामुळे सदरहू काम राज्यामध्ये सर्वत्र कायदयाच्या तरतूदीनुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन कोणत्याही ग्रामपंचायतीमार्फत करणे अनुज्ञेय आहे. तेंव्हा संदर्भाधीन शासन निर्णय व परिपत्रकान्वये गाळ काढण्याचे काम घेण्यास हरकत नाही.

४. तसेच राज्यात निर्माण झालेली तीव्र टंचाईची परिस्थिती, कमी पाऊस या पार्श्वभूमीवर तसेच क्षेत्रिय अधिका-यांची मागणी व या योजनेची उपयोगिता विचारात घेऊन सदर योजनेस ३१ जुलै, २०१३ पर्यन्त मुदतवाढ देण्यात येत आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक क्र. 201303281438027316 हा आहे.

महाराष्ट्रांचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि. गिरीराज

(व्ही. गिरीराज)
प्रधान सचिव (रोहयो)

प्रत :- मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
सर्व मा. मंत्री खाजगी सचिव
मुख्य सचिव
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व जिल्हधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व उपविभागीय अधिकारी (महसूल)
सर्व तहसिलदार (मुंबई शहर व उपनगर वगळून)
सर्व गट विकास अधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी रोहयो प्रभाग, नियोजन विभाग, मंत्रालय
उप सचिव, विधान मंडळ रोहयो समिती,/ विधान भवन मुंबई कक्ष अधिकारी, रोहयो १
(सारसंग्रहासाठी)/निवडनस्ती - रोहयो- १